<u>ॲस्पायर फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६</u>

**ए.एफ./आ.शि.पु/माहितीपत्रक:०७/२०२६**

# "ॲस्पायर फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६"

**www.shikshakpuraskar.com**

**प्रस्तावना:**

शिक्षण हा समाजाच्या विकासाचा मजबूत पाया आहे. शिक्षक हे विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्याचे महत्त्वाचे काम करत असतात. चांगले संस्कार, ज्ञान आणि योग्य मार्गदर्शन देऊन ते देशाचे आदर्श नागरिक घडवतात. त्यामुळे समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीमध्ये शिक्षकांचे योगदान खूप मोठे आहे. इतर अनेक व्यवसायांमध्ये निवृत्तीनंतर व्यक्तींना "माजी" म्हणून ओळखले जाते, पण शिक्षक मात्र आपल्या विद्यार्थ्यांच्या मनात आयुष्यभर "माझे शिक्षक" म्हणून कायम राहतात. हेच शिक्षकांच्या कार्याचे महत्त्व दाखवून देते.

आजचे विद्यार्थी हे उद्याचे देशाचे भविष्य आहेत. त्यांना सक्षम आणि संस्कारक्षम बनवण्यासाठी राज्यातील अनेक शिक्षक प्रामाणिकपणे आणि सेवाभावी वृत्तीने काम करत आहेत. अनेक शिक्षक नवीन उपक्रम राबवून शिक्षणाची गुणवत्ता वाढवत आहेत. अशा शिक्षकांचा गौरव करण्यासाठी शासन आणि विविध संस्था आदर्श शिक्षक पुरस्कार देतात. मात्र, अनेक चांगले आणि मेहनती शिक्षक या पुरस्कारांपासून वंचित राहतात आणि त्यांच्या कार्याची माहिती समाजापर्यंत पोहोचत नाही.

अशा शिक्षकांच्या कार्याचा सन्मान व्हावा आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे,

या उद्देशाने **"ॲस्पायर फाउंडेशन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६"** आयोजित करण्यात येत आहे.

या पुरस्कारासाठी राज्यभरातून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. ॲस्पायर फाउंडेशनची तज्ज्ञ समिती सर्व प्रस्तावांची तपासणी करून विविध निकषांच्या आधारे राज्यातील १०० शिक्षकांची **"राज्य आदर्श शिक्षक"** म्हणून निवड करेल. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील १० शिक्षक असे एकूण ३६० शिक्षकांची **"जिल्हा आदर्श शिक्षक"** म्हणून निवड करण्यात येईल.

याशिवाय, प्रत्येक तालुक्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांना **"तालुका आदर्श शिक्षक"** पुरस्कार देण्यात येतील. तसेच विशेष कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना **"विशेष आदर्श शिक्षक पुरस्कार"** देऊन सन्मानित करण्यात येईल.

तसेच ऑनलाईन पद्धतीने नामनिर्देशन प्रस्ताव दाखल करणाऱ्या परंतु वरील कोणत्याही पुरस्कारासाठी निवड न झालेल्या इतर सर्व सहभागी शिक्षकांना पुरस्कार सोहळ्याच्या दिवशी मंचावर मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल.

या उपक्रमातून उपक्रमाशील शिक्षकांच्या चांगल्या कामाची माहिती समाजापर्यंत पोहोचवणे, त्यांना प्रोत्साहन देणे आणि शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणणे हा ॲस्पायर फाउंडेशनचा मुख्य उद्देश आहे. तसेच **निवडक शाळांना शालेय उपयोगासाठी डिजिटल साहित्य देणगी स्वरूपात दिले जाईल**

**ॲस्पायर फाउंडेशन विषयी:** ॲस्पायर फाउंडेशन ही राज्यातील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात काम करणारी एक नोंदणीकृत सेवाभावी संस्था (एन. जी. ओ.) आहे. **ॲस्पायर फाउंडेशन** या संस्थेला **ISO 9001:2015** मानांकन प्राप्त आहे. तसेच **भारत सरकार नीती आयोगाचीही** मान्यता संस्थेला प्राप्त आहे. संबंधित सर्व कागदपत्रे अधिकृत वेबसाईट वर उपलब्ध आहेत.

## तज्ज्ञ समिती व निवड प्रक्रिया:

**“ॲस्पायर फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६”** साठी प्रस्तावांची छाननी व निवड प्रक्रिया पार पाडण्यासाठी तज्ज्ञ समितीची स्थापना करण्यात येईल. या समितीमध्ये सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी, राष्ट्रीय व राज्य पुरस्कार प्राप्त सेवानिवृत्त शिक्षक व मुख्याध्यापक यांचा सन्माननीय सदस्य म्हणून समावेश असेल. तसेच शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती सदस्य म्हणून कार्य करतील आणि ॲस्पायर फाउंडेशनचे कर्मचारी तांत्रिक सहाय्यक म्हणून काम पाहतील.

आलेल्या सर्व प्रस्तावांची छाननी व शिक्षकांची निवड पारदर्शक पद्धतीने करण्यात येईल. सर्व प्रस्तावांची डिजिटल नोंद एक वर्षासाठी जतन करून ठेवण्यात येईल.

**नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद तसेच राज्य किंवा केंद्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सन्माननीय शिक्षकांनी कृपया या पुरस्कारासाठी नामनिर्देशन प्रस्ताव दाखल करू नयेत.** यामुळे राज्यातील अशा गुणवंत, मेहनती व उपक्रमशील शिक्षकांना संधी मिळेल, ज्यांना अद्याप अशा प्रतिष्ठित पुरस्कारांचा लाभ मिळालेला नाही.

राज्य किंवा केंद्र शासनाचे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक **“ॲस्पायर फाउंडेशन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६”** संदर्भात दूरध्वनी किंवा ई-मेलद्वारे मार्गदर्शन व सूचना देऊ शकतात.

प्राथमिक स्तरावर निवड झालेल्या शिक्षकांनी सादर केलेली माहिती व पुरावे, संबंधित शिक्षक ज्या शाळेत कार्यरत आहेत त्या शाळेशी संपर्क साधून पडताळून पाहण्यात येतील. त्यानंतरच अंतिम निवड यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

तसेच, प्रस्ताव दाखल करणाऱ्या प्रत्येक शिक्षकाला अंतिम निवड यादी ई-मेल आणि व्हॉट्सॲपद्वारे पाठविण्यात येईल.

# ऑस्पायर फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६

**ऑस्पायर फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ निवड समितीची रचना:**

| अ. क्र. | सदस्य | संख्या | पदनाम |
|---|---|---|---|
| १. | सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी | एक | अध्यक्ष |
| २. | प्राथमिक / माध्यमिक शाळेतील राष्ट्रीय / राज्य पुरस्कार प्राप्त सेवानिवृत्त शिक्षक / मुख्याध्यापक | चार | सदस्य |
| ३. | शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणारे शिक्षण तज्ज्ञ | पाच | सदस्य |
| ४. | ऑस्पायर फाउंडेशन कर्मचारी | पंधरा | तांत्रिक सहाय्यक |

**पुरस्काराचे स्वरूप:**

**ॲस्पायर फाउंडेशन राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६:** संपूर्ण राज्यातून आलेल्या प्रस्तावांची छाननी करून तज्ञ समितीमार्फत **१०० शिक्षकांची** निवड हि **"ॲस्पायर फाउंडेशन राज्य आदर्श शिक्षक"** म्हणून केली जाईल. सदर शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व ट्रॉफी प्रदान करण्यात येईल. विद्यादानाचे कार्य करत असतांना बदलत्या तंत्रज्ञानाचा लाभ शिक्षक व विद्यार्थी यांना मिळावा म्हणून ॲस्पायर फाउंडेशन राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ प्राप्त १०० शिक्षकांना नावाजलेल्या कंपनीचा **हाय कॉन्फ्युगरेशन लॅपटॉप** भेटवस्तू म्हणून देण्यात येईल.

**ॲस्पायर फाउंडेशन जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६:** जिल्हा निहाय प्रस्तावांची वर्गवारी करून तज्ञ समितीमार्फत प्रत्येक जिल्हानिहाय १० शिक्षक असे एकूण ३६० शिक्षकांची निवड हि **"ॲस्पायर फाउंडेशन जिल्हा आदर्श शिक्षक २०२६"** म्हणून केली जाईल. सदर ३६० शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व ट्रॉफी प्रदान करण्यात येईल. तसेच या शिक्षकांनाही ॲस्पायर फाउंडेशन नावाजलेल्या कंपनीचा **हाय कॉन्फ्युगरेशन टॅब** भेटवस्तू म्हणून देण्यात येईल. राज्यातून अशा **३६० शिक्षकांची निवड** "ॲस्पायर फाउंडेशन जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६" साठी करण्यात येईल.

**ॲस्पायर फाउंडेशन तालुका आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६:** ॲस्पायर फाउंडेशन आदर्श शिक्षक पुरस्कारापासून तळागाळातील कोणताही गुणवत्तावान , होतकरू व उपक्रमशील शिक्षक वंचित राहू नये म्हणून राज्यातून १०० राज्यस्तरीय आदर्श शिक्षक व राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून १० असे ३६० जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक असे एकूण ४६० शिक्षकांची निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उरलेल्या प्रस्तावांची तालुका निहाय छाननी करून प्रत्येक तालुक्यातून एका शिक्षकाची निवड **"ॲस्पायर फाउंडेशन तालुका आदर्श शिक्षक"** म्हणून करण्यात येईल. सदर शिक्षकासहि वरीलप्रमाणेच शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येईल.

**उत्तेजनार्थ विशेष पुरस्कार:** राज्यातील काही शिक्षक हे स्पेशल स्कूल्स मध्ये कार्यरत आहेत. व काही स्पेशल स्कूल्स ना शासनाचा UDISE Code नाही तसेच ज्या शाळांचे विद्यार्थी National Institute of Open Schooling (NIOS) च्या परीक्षांना बसतात अशा शाळांतील शिक्षकांचेहि प्रस्ताव दाखल करून घेतले जातील व अशा शिक्षकांना वरील पुरस्कारांव्यतिरिक्त उत्तेजनार्थ विशेष पुरस्कार देऊन या सोहळ्यात सामावून घेण्यात येईल.

**सर्व सहभागी शिक्षक:** ॲस्पायर फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ साठी नामनिर्देशन प्रस्ताव दाखल केलेल्या उर्वरित सर्व सहभागी शिक्षकांना पुरस्कार सोहळ्याला आमंत्रित करून मंचावर मान्यवरांच्या हस्ते **शाल, श्रीफळ व सन्मानपत्र** देऊन सन्मानित करण्यात येईल.

**निवडक शाळांसाठी देणगी स्वरुपात एल. ई. डी. स्क्रीन:** शासनाचे व स्वयंसेवी संस्थांचे आटोकाट प्रयत्न सुरु असूनही बदलत्या तंत्रज्ञानाचा फायदा राज्यातील प्रत्येक शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला मिळणे अजूनही शक्य झालेले नाही. ॲस्पायर फाउंडेशन आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ च्या माध्यमातून प्रस्ताव दाखल करण्याऱ्या शिक्षकांसोबत होणाऱ्या संवादातून राज्यातील अनेक शाळांबाबत प्राथमिक माहिती मिळणे अपेक्षित आहे. तज्ञ समितीमार्फत राज्यातील निवडक शाळांना ॲस्पायर फाउंडेशन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ च्या मंचावरून एल. ई. डी. स्क्रीन भेट म्हणून देण्यात येईल.

## पुरस्कार सोहळा:

निवड  झालेल्या पुरस्कार्थींचा व पुरस्कारासाठी उपस्थित मान्यवरांचा यथोचित सन्मान व्हावा यासाठी **“ॲस्पायर फाउंडेशन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६”** पुरस्कार प्रदान सोहळा हा भव्यदिव्य अशा सभागृहात आयोजित करण्याचा ॲस्पायर फाउंडेशन चा मानस आहे. राज्यातील पुरस्कार प्राप्त सर्व शिक्षकांना व शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांना सोयीस्कर होईल या उद्देशाने राज्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या **नाशिक शहरात नांदूर नाका या ठिकाणी भव्य बँक्वेट हॉल मध्ये रविवार दिनांक १८ ऑक्टोबर 2026** या दिवशी भव्य असा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. अंतिम निवड झालेल्या पुरस्कारार्थींना फोन, ईमेल व व्हाट्सॲप द्वारे पुरस्कार सोहळ्याचे निमंत्रण पत्र सोहळ्याच्या तारखेच्या १० दिवस आधी कळवण्यात येईल. पुरस्कार स्वीकार करण्यासाठी राज्य पुरस्कार प्राप्त एक पुरस्कारार्थी आपल्या सोबत मित्र, नातेवाईक किंवा परिवारातील जास्तीत जास्त ५ सदस्यांना आमंत्रित करू शकतात. जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षक आपल्या सोबत जास्तीत जास्त ३ सदस्यांना आमंत्रित करू शकतात व तालुका पुरस्कार प्राप्त व उत्तेजनार्थ पुरस्कार प्राप्त शिक्षक जास्तीत १ सदस्याला आमंत्रित करू शकतात. पुरस्कार सोहळ्यासाठी शिक्षकांना स्वखर्चाने पुरस्कारस्थळी उपस्थित राहावे लागेल. पुरस्कार सोहळ्याच्या दिवशी पुरस्कार स्थळी उपस्थित पुरस्कार्थी व त्यांच्या सोबत आलेले मित्रपरिवार यांच्या चहापानाची सोय ॲस्पायर फाउंडेशन मार्फत करण्यात येईल.

**“ॲस्पायर फाउंडेशन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६”** सन्मान सोहळ्याला नामनिर्देशन प्रस्ताव दाखल केलेल्या परंतु राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय अथवा तालुकास्तरीय पुरस्कारासाठी निवड न झालेल्या उर्वरित **सर्व सहभागी शिक्षकांना ही या पुरस्कार सोहळ्यास आमंत्रित करून मंचावर मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार** असल्याने उर्वरित सर्व सहभागी शिक्षक आपल्या सोबत परिवारातील एका सदस्यास आमंत्रित करू शकतात.

पुरस्कार सोहळ्यासाठी राजकीय व शिक्षण क्षेत्रातील मान्यवर व्यक्ति प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. तसेच सर्व शिक्षक बंधु आणि भगिनी यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करत असतांना फोटो सेशन व व्हिडिओ शूटिंग करण्यात येणार आहे. सदर फोटो आणि व्हिडिओ संबंधित शिक्षक बंधु आणि भगिनी यांना व्हॉटस्ॲप द्वारे पाठविण्यात येईल तसेच **“ॲस्पायर फाउंडेशन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६”** अधिकृत वेबसाईट व सोशल मीडिया हँडल्स फेसबुक आणि इंस्टाग्राम वर शेयर केले जातील.

# ॲस्पायर फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६

**प्रस्तावासाठी आवश्यक अटी:**

१. महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त (खाजगी अथवा सरकारी) शाळेत (प्राथमिक, माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक) शिक्षक म्हणून सेवेत असावा.
२. मराठी, इंग्रजी व उर्दू माध्यमाच्या कोणत्याही सरकारी, निमसरकारी, खाजगी, स्थानिक स्वराज संस्था यांच्या शाळांमध्ये सेवेत असलेले शिक्षक प्रस्ताव दाखल करण्यासाठी पात्र आहेत.
३. स्टेट बोर्ड, सी. बी. एस. ई. बोर्ड, आय. सी. एस. ई. बोर्ड तसेच आय. जी. सी. एस. ई. बोर्डाच्या शाळांतील शिक्षक प्रस्ताव दाखल करण्यास पात्र आहेत.
४. शिक्षक एकूण सेवा किमान १ वर्षे आवश्यक.
५. शिक्षक निर्व्यसनी असावेत अंतिम निवड यादी जाहीर करतांना तज्ञ समितीमार्फत शिक्षक ज्या शाळेत कार्यरत आहे त्या शाळेच्या व्यवस्थापनाशी संपर्क करून या गोष्टीची खातरजमा केली जाईल.
६. शिक्षकांनी शिकवणीत सहभागी होऊ नये.
७. शाळेला UDISE Code असणे आवश्यक. मान्यता नसलेल्या शाळा. खाजगी शिकवणी वर्गातील शिक्षक. खाजगी ऑनलाईन पोर्टल अथवा वेबसाईट वर अध्यापन करणाऱ्या व्यक्ती, पूर्व प्राथमिक शाळा शिक्षक प्रस्ताव दाखल करण्यास पात्र नाहीत.
८. नॅशनल इंस्टीट्यूट ऑफ ओपन स्कूलिंग अंतर्गत सुरु असणाऱ्या स्पेशल स्कूल्स मध्ये शिक्षक म्हणून कार्यरत असणारे शिक्षक शाळेला UDISE Code नसेल तरीही प्रस्ताव दाखल करण्यास पात्र राहतील. त्यांच्यासाठी नियमित शिक्षकांव्यतिरिक्त उत्तेजनार्थ विशेष पुरस्कार प्रदान केले जातील.
९. शिक्षकांनी नामनिर्देशनासाठी सादर केलेले पुरावे स्वयंसाक्षांकित करणे आवश्यक आहे. ॲस्पायर फाउंडेशन हि संस्था शासनाशी सलग्न नसल्याने सदर पुरावे शाळेचे मुख्याध्यापक, गटशिक्षणअधिकारी अथवा प्रशासन अधिकारी यांनी प्रमाणित करण्याची आवश्यकता नाही परंतु प्रस्ताव दाखल करत असतांना शिक्षकांनी दिलेली माहिती व पुरावे हे चुकीची अथवा दिशाभूल करणारी नसावी.
१०. प्राथमिक स्वरुपात निवड झालेल्या सर्व आदर्श शिक्षकांचे प्रस्तावातील माहिती व पुरावे हे शिक्षक ज्या शाळांत कार्यरत असतील त्या शाळांशी संपर्क करून खातरजमा करून घेतली जाईल त्यानंतरच सदर शिक्षकांची यादी वेबसाईट वर व ॲस्पायर फाउंडेशन च्या सोशल मिडिया हँडल वर तसेच वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्यात येईल.
११. प्रस्ताव दाखल करणाऱ्या शिक्षकांची कसल्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु नसावी.
१२. कोणत्याही कारणास्तव निलंबित असलेले शिक्षक प्रस्ताव दाखल करण्यास पात्र नाहीत.
१३. शिक्षकांनी प्रस्तावात दाखल केलेल्या कार्याचे मूल्यमापन तज्ञ समितीकडून गुणांकनाद्वारे केले जाईल.
१४. प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले शिक्षक प्रस्ताव दाखल करण्यास पात्र नाहीत.
**१५. नरगपलिक, महानगरपालिका, जिल्हा परिषद तसेच राज्य अथवा केंद्र शासनाचे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक यांनी कृपया नामनिर्देशन प्रस्ताव दाखल करू नयेत. सदर शिक्षकांनी कृपया फोन व ईमेल द्वारे एस. ॲस्पायर फाउंडेशन ला संपर्क करून आपले बहुमूल्य मार्गदर्शन करावे.**

## ॲस्पायर फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ सर्वसाधारण वेळापत्रक:

| अ.क्र. | कार्यवाही | तारीख |
|---|---|---|
| १. | जाहिरात प्रसिद्धी | ०१/०८/२०२६ |
| २. | नामनिर्देशन शुल्क भरणा अंतिम तारीख | ०५/०९/२०२६ |
| ३. | ऑनलाईन पद्धतीने नामनिर्देशन प्रस्ताव दाखल करणे | १५/०९/२०२६ |
| ४. | तज्ञ समितीकडून नामनिर्देशन प्रस्ताव पडताळणी | २५/०९/२०२६ |
| ५. | तात्पुरते स्वरुपात निवड यादी | ३०/०९/२०२६ |
| ६. | अंतिम निवड यादी वेबसाईट व इतर ठिकाणी प्रसिद्ध करणे | ०५/१०/२०२६ |
| ७. | पुरस्कार वितरण समारंभ | **रविवार १८/१०/२०२६ (नांदूर नाका, नाशिक)** |

**सदर वेळापत्रकात अनपेक्षित बदल झाल्यास नामनिर्देशन प्रस्ताव दाखल केलेल्या सर्व शिक्षकांना ईमेल व व्हाट्सॲप द्वारे सूचित करण्यात येईल.**

# ॲस्पायर फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६

## ॲस्पायर फाउंडेशन आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ निकष:

| अ. क्र. | निकष | टिप्पणी | कमाल गुण |
|---|---|---|---|
| १. | आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा पुढचा टप्पा (अतिरिक्त शैक्षणिक अर्हता) | शैक्षणिक कागदपात्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रति सादर करणे आवश्यक | ७ |
| २. | विद्यार्थ्यांची चाचणी / अध्ययन निष्पत्ती (लर्निंग आउटकम) | उदा. एखाद्या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण शिकवल्या नंतर त्या विद्यार्थ्यामध्ये होणारा अपेक्षित वर्तन बदल | ७ |
| ४. | शैक्षणिक संशोधनपर निबंध / प्रबंध | यास प्राप्त पुरस्कार व सादरीकरण | ३ |
| ५. | वृतपत्र अथवा प्रथितयश नियतकालिकात प्रकाशित लेख | वैचारिक किंवा विश्लेषणात्मक | ३ |
| ६. | शिक्षक शिकवत असलेल्या वर्गातील त्या त्या अध्यापन विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांस विविध क्षेत्रातील प्राप्त पुरस्कार | कला, क्रीडा, संगीत, नृत्य, भाषा, गणित, सामाजिक शास्त्र, स्काऊट गाईड, चित्रकला, खेळ, वकृत्व इ. | ४ |
| ७. | शिक्षकाने केलेले सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातील कार्य तसेच आपत्ती व्यवस्थापन, राष्ट्रीय कार्य इ. | शासन अथवा शासन पुरस्कृत संस्थेकडून अथवा स्वयंसेवी संस्थेकडून प्राप्त पुरस्कार | ७ |
| ८. | शिक्षकाने शाळेच्या उन्नतीसाठी समाजाकडून मिळवलेले योगदान | डिजिटल साहित्य इ. | ४ |
| ९. | ग्रंथलेखन शैक्षणिक व सामाजिक विषयावरचे पुस्तक लिखाण | प्रत्येक ग्रंथास / पुस्तकास एक गुण जास्तीत जास्त ५ गुण | ५ |
| १०. | प्रशिक्षणात तज्ञ मार्गदर्शक म्हणून काम केलेले असल्यास | विविध स्तरावर | ५ |
| ११. | विद्यार्थ्यांच्या प्रज्ञेच्या शोध घेणाऱ्या परीक्षेतील वर्गातील एकूण विद्यार्थ्यांच्या तुलनेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण | राज्य व राष्ट्रीय शिष्यवृत्ती नवोदय, प्रज्ञाशोध ई परीक्षा | ७ |
| ११. | शैक्षणिक क्षेत्राला व गुणवत्तेला स्वतःच्या नवप्रकल्पाद्वारे दिशा देणारे कार्य | ज्ञानरचनावाद, डिजिटल स्कूल, इ. साहित्यनिर्मिती, वाचनप्रेरणा व इतर नवोपक्रम | ४ |
| १२. | विविध ऑनलाईन उपक्रमात सहभाग | स्वाध्याय, अभ्यासमाला इ. | ३ |
| १३. | ऑनलाईन पोर्टल, ॲप, वेबसाईटवर आपल्या विषयाच्या अनुषंगाने स्वतः शैक्षणिक साहित्य निर्मिती करून अपलोड करण्यातील सहभाग | ब्लॉग, वेबसाईट, युट्युब इ. | ४ |
| १४. | शैक्षणिक स्पर्धातील विद्यार्थ्यांचा सहभाग | विज्ञान प्रदर्शन, कला, क्रीडा स्पर्धा, साहित्य स्पर्धा, इन्स्पायर अवार्ड, कृती संशोधन, नवोपक्रम स्पर्धा इ. | ४ |
| १५. | स्वतःच्या वर्गाचा पालक मेळावा | सन २०२५-२६ मध्ये १ असल्यास | ३ |
| १६. | विविध सामाजिक उपक्रमात सहभाग | उदा. रक्तदान, सिडबँक, पर्यावरण संरक्षण, जनगणना, बी. एल. ओ. निवडणूक, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन (कोरोना इ.) | ७ |
| १७. | स्नेह संमेलन सहभाग | सन २०२५-२६ मध्ये | ३ |
| १८. | जीवन कौशल्य विकसन उपक्रम | नाविन्यपूर्ण उपक्रम राबवीत असल्यास | ४ |
| १९. | शैक्षणिक अभ्यास सहल | शाळेच्या सहलीत विद्यार्थ्यांसह स्वतः सहभागी | ३ |
| २०. | क्षेत्रभेटी, शिवारफेरी, वनभोजन | आयोजन व विद्यार्थ्यांसह स्वतः सहभागी | ३ |
| | | एकूण गुण | ९० |

# <u>ॲस्पायर फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६</u>

वरील निकषांनुसार पडताळणी व छाननी करून शिक्षकांची अंतिम निवड करतांना शिक्षकांचा शैक्षणिक, सामाजिक दर्जा, तसेच सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण याबाबत संवेदनशीलता व त्यासाठी केलेले विशेष प्रयत्न राष्ट्रीय दृष्टीकोनाबाबत विचार, कार्य व उपक्रम निवड समिती विचारात घेईल व त्यासाठी अतिरिक्त विशेष गुणदान केले जाईल. प्रत्येक नामांकन करणाऱ्या शिक्षकांनी शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी लागणारा दृष्टीकोन आवर्जून मांडावा त्याचाही विचार समितीद्वारे बारकाईने केला जाईल. त्यामुळे वरील निकषांव्यतिरिक्त शिक्षकांचे जे जे अतिरिक्त योगदान असेल त्याची पुराव्यासहित माहिती प्रस्तावात नमूद करावी.

**खालील मुद्देही अतिरिक्त गुणदानासाठी विचारात घेतले जातील.**

- शिक्षकांनी स्वतःची कौशल्ये सुधारण्यासाठी वैयक्तिकरित्या केलेले इतर कोणतेही प्रयत्न.
- आनंददायी शिक्षणासाठी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर.
- विद्यार्थ्यांवर अध्यापनाचा अधिक चांगला परिणाम व्हावा यासाठी शिक्षकाने अवलंबलेल्या सर्जनशील पद्धती इत्यादी उदा. कथा-कथन, कला, खेळ, उदाहरणे इ.
- शिकण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी वर्गात अध्यापन पद्धती सुधारण्याच्या प्रक्रियेत विषयाचा वास्तविक जीवनातील परिस्थितीशी संबंध जोडणे, खुल्या चर्चेला प्रोत्साहन देणे.
- इतर शिक्षकांसाठी मार्गदर्शक म्हणून काम करणे.
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वर्गाच्या भिंतींच्या पलीकडे जाऊन मार्गदर्शन करणे.
- पोषण, स्वच्छतागृह, मासिक पाळी स्वच्छता, बालविवाह, वंचित मुलांचे उत्थान इत्यादी सामाजिकदृष्ट्या संवेदनशील विषयांबाबत मुलांमध्ये सामाजिक जागरूकता पसरवण्यासाठी शिक्षकांनी केलेले कार्य.

**"ॲस्पायर फाउंडेशन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६"** साठी मान्यताप्राप्त खाजगी शाळांतील शिक्षकांकडून हि प्रस्ताव मागवण्यात येत असून अशा शाळांतील शिक्षकांना वरीलपैकी काही निकष लागू होतीलच असे नाही. अशा शिक्षकांनी वरील निकषांशी साधर्म्य असलेले जे काही योगदान शैक्षणिक कार्यात दिले असेल त्याची इत्यंभूत माहिती प्रस्तावात द्यावी.

**वरील तालिकेनुसार एकूण गुण ९० व विशेष अतिरिक्त योगदान यासाठी राखीव ३० गुण असे एकूण १२० गुणांचे मूल्यमापन केले जाईल.**

## ऑनलाईन प्रोफाइल आणि वोटिंग सिस्टिम:

**"ॲस्पायर फाउंडेशन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६"** साठी शिक्षक बंधु भगिनी यांनी प्रस्ताव दाखल केल्यानंतर प्रत्येक शिक्षकाचे एक ऑनलाईन प्रोफाइल तयार करण्यात येईल व त्याची लिंक संबंधित शिक्षकास पाठवली जाईल. सदर लिंक संबंधित शिक्षक फेसबुक, इंस्टाग्राम तसेच व्हॉटस्ॲप स्टेट्स व ग्रुप वर शेयर करू शकतात या ऑनलाईन प्रोफाइल वर ऑनलाईन वोटिंग ची सुविधा असेल. या ऑनलाईन प्रोफाइल वर जितके जास्त वोट्स येतील त्या प्रमाणात संबंधित शिक्षकास गुणदान करण्यात येईल. ऑनलाईन प्रोफाइल वर आलेले वोट्स काऊंट करून पर्सेंटाइल फॉर्म्युला वापरुन ८० गुणांचे मूल्यमापन केले जाईल.

असे **एकूण २०० गुणांचे मूल्यमापन** करून ॲस्पायर फाउंडेशन आदर्श शिक्षकांची निवड करण्यात येईल.

## ॲस्पायर फाउंडेशन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ नामनिर्देशन प्रक्रिया:

**१. ॲस्पायर फाउंडेशन आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ साठी रु. १९९९/- मात्र नामनिर्देशन शुल्क आहे.**
२. नामनिर्देशन शुल्क नॉन रीफंडेबल आहे व कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.
३. नामनिर्देशन शुल्क कोणत्याही यु. पी. आय. ॲप द्वारे (फोन पे, गुगल पे, पेटीएम, भीम ॲप इ.) ॲस्पायर फाउंडेशन संस्थेचा QR कोड स्कॅन करून संस्थेच्या खात्यावर पाठवावे.
४. ऑनलाईन पेमेंट लिंक द्वारे डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड व नेटबँकिंग द्वारे नामनिर्देशन शुल्क भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.
५. नामनिर्देशन शुल्क बँक ट्रान्स्फर द्वारे संस्थेच्या खात्यावर जमा करण्यासाठी बँक खाते क्रमांक

अकाउंट नाव – **Aspire Foundation**
खाते क्रमांक – **0610102000017329**
बँक IFSC Code - **IBKL0000103**
ब्रांच – **नाशिक मेन ब्रांच**

६. ॲस्पायर फाउंडेशन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ साठी नामनिर्देशन प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने दाखल करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील लिंक वर क्लिक करून ऑनलाईन पद्धतीने नामनिर्देशन प्रस्ताव दाखल करता येईल तसेच www.shikshakpuraskar.com या अधिकृत वेबसाईट वर भेट देऊनही शिक्षक बंधु भगिनी प्रस्ताव दाखल करू शकतात
७. ॲस्पायर फाउंडेशन आदर्श शिक्षक पुरस्कार निवडी साठी तज्ञ समिती गठीत करण्यात आलेली असल्याने तसेच राज्य, जिल्हा व तालुकास्तरावर आणि विशेष उत्तेजनार्थ पुरस्कार हे प्रस्ताव पडताळणी, छाननी व निकषांनुसार योग्य ते मूल्यमापन करूनच जाहीर करण्यात येणार असल्याने पुरस्कार अंतिम यादी निवड करण्याचा पूर्ण अधिकार समितीकडे राहील. निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.
८. अधिक माहिती साठी संस्थेच्या हेल्पलाईन नंबर **9325005833**, **9226646474** अथवा **7058397976** वर कॉल अथवा व्हाट्सॲप द्वारे संपर्क करता येऊ शकतो.

## ॲस्पायर फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६

### ॲस्पायर फाउंडेशन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ विहित नमुना अर्ज

पासपोर्ट

साईज

फोटो

१. संपूर्ण नाव:-________________________________________

(आडनाव) (नाव) (वडील/पतीचे नाव)

२. कार्यरत शाळेचे नाव:________________________________________

३. कार्यरत पदनाम:-________________________________________

(शिक्षण सेवक, सहा. शिक्षक, शिक्षक, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, प्राचार्य)

४. प्रमुख विषय:-________________________________________

५. एकूण सेवाकाळ:-________________________________________

(वर्ष महिने)

६. शाळेचा स्तर:-________________________________________

(प्राथमिक, माध्यमिक अथवा उच्च माध्यमिक)

७. माध्यम:-________________________________________

(मराठी, इंगजी, उर्दू इ.)

८. शाळेचा व्यवस्थापन प्रकार:-________________________________________

(शासकीय, खाजगी, खाजगी अनुदानित, विना अनुदानित, स्वयं अर्थसहाय्यित, जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, कटक मंडळ, इतर)

९. शाळा संलग्नता:-________________________________________

(स्टेट बोर्ड, सी. बी. एस. ई. बोर्ड, आय. सी. एस. ई., आय. जी. सी. एस. ई. इ.)

१०. संस्थेचे नाव:-________________________________________

(लागू असल्यास)

११. शाळा प्रमुखाचे नाव व पदनाम:-______________________________________________

१२. शाळा प्रमुखांचा संपर्क क्रमांक:-______________________________________________

१३. शाळेचा पूर्ण पत्ता:-______________________________________________

तालुका:-______________

जिल्हा:-______________

पिन कोड:-______________

१४. मोबाईल नंबर:-________________________

१५. अतिरिक्त मोबाईल नंबर:-____________________

१६. ई मेल आय डी:-________________________

१७. पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता:-______________________________________________

______________________________________________

______________________________________________

१८. शैक्षणिक अर्हता:-______________________________________________

**२०. शैक्षणिक अर्हता:**

| अ. क्र. | उत्तीर्ण परीक्षा | प्राप्त अर्हता (मुख्य विषय) | विद्यापीठ मंडळ | वर्ष | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

२१. सेवा अभिलेख:

| अ. क्र. | शाळेचे नाव | स्तर | व्यवस्थापन | सेवेचा कालावधी (वर्ष महिने) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

# <u>ॲस्पायर फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६</u>

## स्वयंघोषणापत्र

मी. श्री. / श्रीमती

____________________________________________________________________पदनाम_______________________

शाळेचे

नाव________________________________________________________________________________________

_______

याद्वारे घोषित करतो / करते कि, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. तसेच ॲस्पायर फाउंडेशन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ च्या अटी शर्ती मला मान्य आहेत.

**ठिकाण:-**

**शिक्षकाची सही:-**

**दिनांक:-**

**शिक्षकाचे नाव:-**

**टीप: ऑनलाईन पद्धतीने नामनिर्देशन प्रस्ताव दाखल करत असल्यास ऑफलाईन अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही. ऑनलाईन पद्धतीने पस्ताव सादर करण्यासाठी https://shikshakpuraskar.com या संकेतस्थळाला भेट द्यावी.**

## अध्यक्षांचे मनोगत

**प्रिय शिक्षक बंधू-भगिनींनो,**

शिक्षक हा समाजाचा आधारस्तंभ आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देण्याचे आणि देशाचे सुजाण नागरिक घडवण्याचे महान कार्य आपण सर्वजण निष्ठेने करत आहात. आपल्या ज्ञान, संस्कार आणि सेवेमुळे समाज अधिक सक्षम आणि समृद्ध होत आहे.

राज्यातील अनेक शिक्षक शांतपणे आणि प्रामाणिकपणे उत्कृष्ट काम करत आहेत. मात्र, त्यांच्या कार्याची दखल अनेकदा घेतली जात नाही. अशा गुणवंत, उपक्रमशील आणि समाजाभिमुख शिक्षकांना योग्य व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा, या उद्देशाने ॲस्पायर फाउंडेशनतर्फे “राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६” आयोजित करण्यात आला आहे.

हा पुरस्कार केवळ सन्मान नसून, राज्यातील प्रेरणादायी शिक्षकांचे कार्य समाजापर्यंत पोहोचवण्याचा आणि इतर शिक्षकांना प्रोत्साहन देण्याचा एक छोटासा प्रयत्न आहे. आपल्या अनुभवातून, नाविन्यपूर्ण उपक्रमातून आणि विद्यार्थ्यांसाठी केलेल्या कार्यातून आपण समाजासमोर एक आदर्श निर्माण करत आहात.

म्हणूनच, राज्यातील सर्व पात्र शिक्षक बंधू-भगिनींना नम्र आवाहन आहे की, त्यांनी या पुरस्कारासाठी आपले नामनिर्देशन प्रस्ताव निश्चितपणे सादर करावेत. तसेच आपल्या परिसरातील इतर गुणवंत शिक्षकांनाही या उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे.

आपल्या कार्याचा योग्य सन्मान करणे ही आमची जबाबदारी आणि आपल्यासारख्या शिक्षकांचा आशीर्वाद मिळणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.

आपल्या उज्ज्वल कार्यास मनःपूर्वक शुभेच्छा!

**धन्यवाद!**

**आपला विश्वासू,**



**(श्री. बबनराव मधुकर वाघ)**
**अध्यक्ष, ॲस्पायर फाउंडेशन, महाराष्ट्र**